जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/०६/२०२४
## दि.२०/०६/२०२४ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ३५५/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४७ वर्षे, रा.वडगाव बुा पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०६/२०२४ रोजी सायं.१८/३० वा.चे सुमा.व्हिजन एक्सप्रेस दुकान समोर फुटपाथ वरुन आनंदनगर सिंहगड रोड पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणावरून घरी पायी पायी जात असताना,नमुद इसम हा दुचाकीवरून फिर्यादी यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील ४०,०००/-रू.कि.चे सोन्याचे मिनी गंठन हे जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.लिटे मो.नं.९९२२९३३११३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २१०/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६३ वर्षे रा.शाहु कॉलेज रोड,पुणे. |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०३/२०२४ ते दि. १८/०६/२०२४ रोजी पर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या घरी असताना त्यांचे मोबाईलवर आलेल्या लिंकवर क्लिक केल्यानंतर Investment Exchange Group No.1 या व्हॉटसअॅप ग्रुपमध्ये त्यांना अॅड करुन घेवुन शेअर मार्केट ट्रेडींग गुंतवणुकी संदर्भात ऑनलाईन लेक्चर घेवुन त्यांचा विश्वास संपादन करुन BC Partners हे अॅप डाऊनलोड करण्यास सांगुन शेअरमार्केट मध्ये गुंतवणुक करण्यास भाग पाडुन वेगवेगळे बँक अकाऊंट नंबर पाठवुन त्यावर शेअरमार्केट मधील गुंतवणुकीकरीता वेळोवेळी पैसे भरण्यास सांगुन ४५,६०,०००/- रु. स्विकारुन फिर्यादी यांना शेअर मार्केट मध्ये कोणताही फायदा मिळवुन न देता फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री नंदकुमार गायकवाड मो.नं.९८७०४७५३३५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे २५०/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,३३७,मो.व्ही.अॅक्ट११९/१७७,१८४, १३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | खेमराज जाधव वय ३२ वर्षे रा.माणगांव पारखीवस्ती,ता.मुळशी जि.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०६/२०२४ रोजी पहाटे ०५/३० वा ते ०५/४५ वा चे सुमा.मुंबई बंगलोर हायवे रोडवर चांदणी चौका कडुन वारजे कडे जाणा-या रोडवरील टाटा मोटर्स शोरुमचे समोर वारजे पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे मोटार सायकलला जबर ठोस मारून, फिर्यादी यांची बहिण जयश्री जाधव वय २४ वर्षे, रा.जोडगव्हाण ता.मालेगाव जि.वाशीम हिस गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.शिंदे मो.नं.८८८८३००९८१ |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९९९/२०२४,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३७ वर्षे रा.गोंधळेनगर हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०४/२०२४ रोजी पासून ते दि. १५/०५/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद अज्ञात मोबाईल धारक यांनी शेअर्स ब्लॉक ट्रेडमध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन पैसे कमविण्यासाठीचे आमिष देवुन त्यांचे बँक खातेवर पैसे स्विकारुन फिर्यादी यांची २४,३४,५०७/- रु.ची आर्थिक फसवणुक केली |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्रीमती मंगल मोढवे मो.नं.९८२३१७०२६२ |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ७२५/२०२४ भादविक ३५३,५०४,१८६,महा.दारुबंदी अधि.नियम.८५(१) |
| **फिर्यादी** | अशिष गरुड पोलीस अंमलदार कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०६/२०२४ रोजी पहाटे ०२/००वा.सुमा.दोराबजी मॉल समोरिल सार्वजनिक रोडवर, उंन्ड्री, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पोलीस अंमलदार पाटील यांच्यासह बीट मार्शल वरुन पेट्रोलिंग करुन नमुद ठिकाणी माय सेफ अॅपवर फोटो अपलोड करुन सरकारी कर्तव्य करित असताना विनाकारण थांबलेले नमुद इसम व त्यांचे साथीदार यांना विचारपुस करुन त्याचे ओळखपत्राची खात्री करण्याची मागणी केली असता नमुद इसम यांने दारुचे सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी आरडा ओरड करुन ओळखपत्र देण्यास नकार देवुन फिर्यादीशी हुज्जत घालुन त्यांना धक्का देवुन फिर्यादी करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.लेखाजी शिंदे मो.नं.९४२०००१९९५ |

**६**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९९८/२०२४,भादविक ३३६,४२७,३४ आर्म्स अॅक्ट ४,(२५), क्रि.लॉ. अमेंडमेंट अॅक्ट ३,७ मपोका कलम ३७(१)/१३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५० वर्षे, रा.गंगानगर फुरसुंगी,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०६/२०२४ रोजी २१/३० वा चे सुमा.गंगा नगर,फुरसुंगी, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व त्यांचा एक साथीदार याने नमुद ठिकाणी गाडयांचे लोखंडी हत्याराने काचा फोडुन तसेच दरवाजाचे नुकसान करून व त्याचे हातातील लोखंडी हत्यार हे हवेत फिरवुन आम्ही या एरीयातले भाई आहोत, कोणी मध्ये आले तर मारुन टाकीन असे बोलुन सदर परीसरात दहशत निर्माण केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पवार मो.नं.८७८८२३२४१९ |

**७**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १००२/२०२४,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५८ वर्षे रा.हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०४/२०२४ रोजी पासून ते दि. २८/०५/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद अज्ञात मोबाईल धारक यांनी फेसबुक वर शेअर मार्केट जाहिरात व लिंक पाठवुन फिर्यादी यांना त्यांचे व्हॉटसमध्ये अॅड करून २५% ५०% अशा प्रमाणात नफा मिळण्याचे आमिष देवुन फिर्यादी यांची एकुण १०,००,०००/- रु.ची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री.गित्ते मो.नं.९९२३१९३०८८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**